दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
● वर्ष १७ वे ● अंक ३० ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● रविवार दि.१ मे २०२२ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## नवनीत राणा दाम्पत्याला सोमवारपर्यंत तुरुंगातच रहावे लागणार

**दै.रायगड नगरी । मुंबई**

मातोश्रीबाहेर हनुमान चालिसा म्हणण्याच्या आव्हानावरून खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्या अडचणी वाढत चालल्या आहेत. पोलिसांवर जातीयवादाचे आरोप करून त्या फसल्या आहेत. यातच आज त्यांच्या जामिन अर्जावरील सुनावणी पुढे गेली असून आज काहीही निर्णय झालेला नाही. यामुळे राणा दाम्पत्याला आता सोमवारपर्यंत तुरुंगातच रहावे लागणार आहे.

मुंबईच्या सत्र न्यायालयातील पीएमएलए कोर्टात राणांच्या जामिन अर्जावर सुनावणी सुरु आहे. राणांकडून वकील रिझवान मर्चंट आणि आबाद पोंडा बाजू मांडत आहेत. तर सरकारी वकील प्रदीप घरत सरकारच्या वतीने युक्तीवाद करत आहेत. राणांवर दाखल करण्यात आलेला देशद्रोहाचा गुन्हा हा मातोश्रीवर हनुमान चालिसा म्हटल्याने दाखल करणे चुकीचे आहे, असा युक्तीवाद राणांच्या वकिलांनी केला आहे. तर राणा हे समाजातील वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत असल्याचे घरत यांनी म्हटले आहे. शुक्रवारी झालेल्या सुनावणीमध्येही पोलिसांनी राणा यांना जामिन देण्यास विरोध केला होता.

# राज्यातील सौहार्द बिघडवण्याचा प्रयत्न कराल तर जनता त्यांना उत्तर देण्यास समर्थ : मुख्यमंत्री

## महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येस राज्यातील जनतेला शुभेच्छा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**'कितीही अडथळे आणि संकटं येऊ देत, महाराष्ट्राची घोडदौड सुरूच राहील. अवघ्या देशाला स्फूर्ती देणारा हा शिवरायांचा महाराष्ट्र आहे, ज्यांनी संयुक्त महाराष्ट्रासाठी आपले रक्त सांडले त्यांचे बलिदान कधीही विसरणार नाही आणि हे करताना महाराष्ट्र धर्माची पताका देशातच नव्हे तर विश्वात फडकाविल्याशिवाय राहणार नाही', असा ठाम विश्वास व्यक्त करत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येस राज्यातील जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. आज महाराष्ट्राच्या अस्मितेवर घाव घालण्याचे आणि महाराष्ट्राला बदनाम करण्याचे कुटील कारस्थान जर कुणी करीत असेल तर येथील स्वाभिमानी जनता त्यांना उत्तर देण्यास समर्थ आहे, असा इशाराच मुख्यमंत्र्यांनी आपल्या संदेशात दिला आहे.**

'आमचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आल्यानंतरचा हा तिसरा महाराष्ट्र दिन आहे. दोन वर्षे तर देशावर करोना विषाणूचे संकट होते, पण याही आव्हानात्मक परिस्थितीत शेती, उद्योग – गुंतवणूक यामध्ये महाराष्ट्राने स्वतःला आघाडीवर ठेवले. शिवभोजनसारखी थाळी मोफत देऊन, तसेच दुर्बल, असंघटित वर्गाला आर्थिक सहाय्य करून सामाजिक भान ठेवले आणि महाराष्ट्राची परंपरा कायम ठेवली. आरोग्य असेल किंवा सुशासन, पर्यावरण असेल किंवा नागरी विकास, महाराष्ट्राने उचललेल्या ठोस पावलांचे देश तसेच जागतिक पातळीवरही कौतुक झाले. संकटातच खरी परीक्षा होते असे म्हणतात, त्याप्रमाणे गेल्या अडीच वर्षात नैसर्गिक आपत्ती किंवा विषाणूच्या आक्रमणात प्रशासनाने अगदी तळागाळापासून अतिशय धीराने आणि हिमतीने काम केले, त्यामुळे महाराष्ट्राला बदनाम करण्याचा विडा उचलून सर्वांचे मनोधैर्य खची करण्याचे प्रयत्न फिके पडल्याचे दिसते', असे मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले.

महाराष्ट्राचा इतिहास लढवय्यांचा आहे मग मोगलांच्या आक्रमणाला थोपविणारे छत्रपती शिवराय, औरंगजेबाला ललकारणाऱ्या तार–ाराणी असोत किंवा सामाजिक सुधारणांसाठी आयुष्य पणाला लावणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज , महात्मा जोतिबा आणि सावित्रीबाई फुले असोत. या सर्वांनी आणि त्यांना आदर्शवत मानणाऱ्या अनेकांनी जात पात धर्म याचा विचार न करता महाराष्ट्राची सामाजिक वीण मजबूत केली. या भूमीचे सुपुत्र असलेल्या महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली घटना म्हणणे केवळ एक पुस्तक नाही तर देशातील प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार देणारी एक अनमोल देणगी आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी



शुभेच्छा संदेशात म्हटले आहे.

दुर्दैवाने आज स्वार्थ आणि महत्त्वाकांक्षेपोटी महाराष्ट्रामधील जात धर्मांतील सलोखा संपवून सामाजिक क्रांतीच्या या तमाम महापुरुषांचे विचार मातीस मिळविण्याची काम काहीजण करीत आहेत. मात्र, महाराष्ट्र हा सामाजिक सलोखा, संयम आणि सारासार विवेकबुद्धीने वागणारा म्हणून ओळखला जातो. एखाद्या राज्याची प्रगती म्हणजे काही केवळ किती गुंतवणूक तिथे आली आणि किती रस्ते झाले असे नाही. महाराष्ट्राने पर्यावरणासारख्या मूलभूत आणि संवेदनशील विषयवार जगाचेही लक्ष वेधले आहे. आरोग्याची पुढील काळातली आव्हाने लक्षात घेऊन आधुनिक वैद्यकीय पायाभूत सुविधांचे नियोजन केले आहे. खेडी, शहरे स्वच्छ असावीत, सर्वांना व्यवस्थित नळाने पाणी मिळावे, सर्वसामान्यांना घरे मिळावीत, शहरांचे आराखडे हे पुढील काही वर्षांच्या विकासाचा अदमास घेऊन तयार करावेत, विकेल तेच पिकेल असे ठरवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे, सौर ऊर्जेचा वापर, महिलांच्या सुरक्षेसाठी शक्ती कायद्याच्या माध्यमातून गुन्हेगारांवर वचक या गोष्टींवर आम्ही केवळ भरच दिलेला नाही तर अंमलबजावणी सुरू केली आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी अध–ोरेखित केले.

संघराज्य व्यवस्थेचा आम्ही सन्मानच करतो. विकासासाठी उत्तुंग झेप घेण्याची दुर्दम्य इच्छा आमच्यात आहे. राष्ट्राच्या प्रगतीत यो–गदान देण्याचे कर्तव्य आम्हाला पार पाडायचे आहे आणि पार पाडतही आहोत. मला खात्री आहे की, येणाऱ्या काळात महाराष्ट्रातील माझे तमाम बंधू आणि भगिनी हे ज्यासाठी महाराष्ट्र ओळखला जातो त्या परस्पर सौहार्द, बंधुभाव आणि एकोप्याचे वातावरण कलुषित होऊ देणारे सगळे प्रयत्न हाणून पाडतील. माझे सर्वांना, अगदी विरोधी पक्ष आणि संघटना यांना देखील कळकळीचे आवाहन आहे की, मनात विद्वेष न ठेवता महाराष्ट्राचा देशातच नव्हे तर जगात डंका वाजविण्यासाठी एकत्र येऊन महाराष्ट्राची पताका हातात घेऊ यात, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले.

## फोटो स्टुडिओ मधील 3 कॅमेरे, लॅपटॉप व कॉम्प्युटर घेऊन केला पोबारा




**दै.रायगड नगरी । उरण**

उरण शहरातील करंजा रोड, आंनदनगर समोरील गजबजलेल्या उरण शहरातील मुख्य रस्त्यावरील नितीन फोटो स्टुडिओच्या शटरचे दोन कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी स्टुडिओ मधिल तीन कॅमरे, लॅपटाप व कम्प्युटर हे सामान्य घेऊन पोबारा केल्याची घटना उरण पोलिस ठाण्याच्या हद्दीत घडली आहे. या घटनेसंदर्भात नितीन फोटो स्टुडिओचे मालक नितीन मालुसरे यांनी उरण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

उरण शहरातील मुख्य रस्त्यावरील आनंद नगर जवळच नितीन मालुसरे यांचा फोटो स्टुडिओ आहे. नितीन मालुसरे हे नेहमी प्रमाणे आपला फोटो स्टुडिओ बंद करून घरी गेले होते. सकाळी नेहमीप्रमाणे ते आपल्या फोटो स्टुडिओमध्ये आले असता. स्टुडिओच्या शटरचे दोन कुलूप तोडून पडल्याचे व शटर उघडले असल्याचे चित्र दिसून आले.नितीन मालुसरे यांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन उरण पोलिस ठाण्यात धाव घेऊन घडलेल्या घटनेची खबर दिली.

उरण पोलीस ठाण्याचे अधिकारी, कर्मचारी यांनी फोटो स्टुडिओची तात्काळ पाहणी केली असता.रात्रीच्या अंधाराचा फायदा उठवतअज्ञात चोरट्यांनी स्टुडिओच्या शटरचे दोन कुलूप तोडून चोरी केल्याचा संशय व्यक्त केला. त्यावेळी नितीन मालुसरे यांनी आपल्या फोटो स्टुडिओ मधिल तीन कॅमरे, दोन लॅपटाप व एक कम्प्युटर चोरीस गेल्याचे पोलीसांना

...../२

## संक्षिप्त...

### गणेश नाईक पुरते अडकले, दोन्ही अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले

**दै.रायगड नगरी । ठाणे**

ठाणे सत्र न्यायालयाने भाजप नेते गणेश नाईक यांचे दोन्ही अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळले आहेत. नवी मुंबईच्या एका महिलेने त्यांच्यावर गैरवर्तनासह बलात्काराचा आरोप केला होता. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीनंतर नाईकांवर गुन्हा दाखल झाला होता. गेल्या अनेक दिवसांपासून नाईक फरार आहेत. त्यांनी दोन वेळा जामीनासाठी अर्ज दाखल केला. परंतु न्यायालयाने दोन्ही वेळा त्यांचे जामीन अर्ज फेटाळले. त्यामुळे नाईकांवर अटकेची टांगती तलवार कायम आहे.

महिलेच्या तक्रारीनुसार, गणेश नाईक यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर गणेश नाईक फरार झाले आहेत. पोलिसांकडून गणेश नाईक यांची शोध मोहीम सुरू आहे. याच दरम्यान गणेश नाईक यांनी आपल्या अटकपूर्व जामीनासाठी ठाणे न्यायालयात अर्ज केला होता. त्यावर आज सुनावणी पार पडली. यावेळी न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्याने गणेश नाईक यांच्यावर टांगती तलवार कायम आहे. गणेश नाईक यांच्याविरोधात एका महिलेने लैंगिक शोषणाची तक्रार नेरूळ पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. त्यामुळे नेरूळ पोलिसांनी नाईक यांच्यावर बलात्काराचा गुन्हा दाखल केला. या प्रकरणातील तक्रारदार महिला १९९३मध्ये वाशी सेक्टर–१७मधील बिग फ्लॅश स्पोर्ट्स क्लब येथे रिसेप्शनिस्ट म्हणून काम करत होती. यावेळी नाईक वारंवार क्लबमध्ये बैठकीसाठी येत असत. ओळख झाल्यानंतर ते मला संपर्क करत होते. सन १९९५पासून आमच्यातील मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले. त्यावेळी नाईक यांनी मला पारसिक हिल येथील बंगल्यात नेऊन शरीरसंबंध प्रस्थापित केले. पुण्यात फिरण्यासाठी गेल्यानंतरही आमच्यामध्ये संमतीने शरीरसंबंध प्रस्थापित झाले, असे या महिलेने तक्रारीत म्हटलं आहे.

## पर्यटनात वाहनांच्या वर्दळीने मजगांव स्थानक रस्ता धोकादायक

### रस्त्यावर झेब्रा पट्टे गतीरोधक बसवावेत प्रवासी व नागरिकांची मागणी



**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड–जंजिरा पर्यटनात साळाव ते मुरुड दरम्यान वाहनांची वाढती वर्दळ असून मजगांव स्थानकावर अपघा–ताची शक्यता लक्षात घेऊन झेब्रा पट्टे मारावेत किंवा गतीरोधक बसवावेत. अशी मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

मुरुड–जंजिरा पर्यटनात जंजिरा किल्ला, कुडालेणी आदी. पर्यटन स्थळे, समुद्र सफरीचा मनमुराद आनंद लुटण्यासाठी शनिवार, रविवार तसेच सुटीच्या दिवशी पर्यटक मोठ्या प्रमाणावर येत आहेत.

या रस्त्यावर सातत्याने वाढती वर्दळ असते. मजगांव स्थानक दरम्यान अतिवेगाने येणाऱ्या वाहनांमुळे अनेक वेळा छोटेमोठे अपघात झाले आहेत. याठिकाणी वेळप्रसंगी अपघाताची शक्यता लक्षात घेऊन शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने या रस्त्यावर झेब्रा पट्टे किंवा गतीरोधक बसविण्यात यावेत. अशी मागणी नागरिक व प्रवासी वर्गातून होत आहे.

## कशेडी घाटामध्ये दोन अपघात ; दोघेजण ठार तर अन्य किरकोळ जखमी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

तालुक्यातील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६वर कशेडी घाटामध्ये शुक्रवारी मध्यरात्री व शनिवारी पहाटे झालेल्या दोन अपघात झाले. या दोन्ही दूर्घटनांमध्ये मध्यरात्री झालेल्या पहिल्या अपघातात दोन जण ठार तर एक जखमी झाला तर पहाटे झालेल्या दुसऱ्या अपघातात कोणीही जखमी झाले नसून दोन्ही अपघातात चार वाहनांची मोठ्या प्रमाणात मोडतोड होऊन हानी झाली आहे.

शनिवार, दि.३० एप्रिल २०२२ रोजी पावणेएक वाजण्याच्या सुमारास पोलादपूर तालुक्यातील भोगाव जवळीत संत तुकाराम मंदिर शेजारी मुंबई दिशेकडून वाशी नवी मुंबई ते देवगड दिशेकडे जाणारी बोलेरो पिकअप (क्र.एम.एच.०७– एजे–२१८७) व जयगड ते ठाणे मुंबईकडे जाणारा ट्रक (क्र. एमएच०४ एफपी–२२८७) यांच्यात समोरासमोर ठोकर होऊन अपघात झाला आहे. अपघाताची माहिती समजताच कशेडी टॅप वाहतूक पोलीस टॅपचे पोलीस उपनिरीक्षक ए.पी.चांदणे आणि स्टाफ यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता अपघातातील दोन्ही वाहनांची सम ोरासमोर जोरात ठोकर झाली होती. यामध्ये बोलेरो पिकअप जीपमधील तुषार प्रकाश चव्हाण (वय –२४, रा. नारिंग्रे, ता.देवगड) आणि निलेश मनोहर शेटये (वय–३६, रा.मुंडगे,ता.देवगड) हे गंभीर दुखापत होऊन जागीच मयत झालेले आहेत. या अपघातात उमेश उत्तम कोरडे (वय– २४ रा. देवगड) यांना किरकोळ व गंभीर दुखापत झाली आहे. अपघातातील दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अपघातस्थळी अप–घातातील दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला करून वाहतूक सुरळीत चालू करण्यात आली आहे. याप्रकरणी महाडचे डीवायएसपी निलेश तांबे आणि पोलादपूर पोलीस ठाण्याचे एपीआय प्रशांत जाधव यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली. मृतदेह पोलादपूर ग्रामीण रूग्णालयामध्ये हलविण्यात आले तर पोलीस हवालदार

...../२



## लोडशेडींग व नागरिकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी शिवसेनेने काढला धडक मोर्चा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

वारंवार खंडित होणार वीजपुरवठा, लोडशेडींग व नागरिकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी शिवसेनेने आज खांदा कॉलनी येथील महावितरणच्या कार्यालयावर धडक मोर्चा काढून संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारला.

जिल्हा प्रमुख शिरीष घरत यांच्या आदेशा नुसार पनवेल विधानसभा संघटक दिपक निकम, महानगर प्रमुख रामदास शेवाळे व खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के यांच्या नेतृत्वाखाली खांदा कॉलनीतील महावितरण च्या कार्यालयवर वारंवार खंडित होणार वीजपुरवठा, लोडशेडींग व नागरिकांना भेडसावणाऱ्या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी धडक मोर्चा काढला होता. सदर मोर्चाला खांदा कॉलनी मधील पुरुष व महिला पदाधिकारी, शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



यामध्ये पनवेल महानगर संघटीका अँड शुभांगी शेलार, उपमहानगर प्रमुख रामदास गोंधळी, उपमहानगर संघटक शिवाजी दांगट, उपमहानगर संघटिका संचिता राणे, शहर संघटिका सानिका मोरे, शहर समन्वयक गणेश परब, उपशहरप्रमुख दत्तात्रेय शंकर महामुलकर, संपत सुवर्णा, उपशहरसंघटक संजीव गमरे, प्रकाश वानखेडे,

...../२

## नवी मुंबईत व्यंकटेश्वरा मंदिरासाठी जमीन देण्याचे पत्र आदित्य ठाकरे यांनी केले तिरुपती देवस्थानास सुपुर्द

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नवी मुंबईतील उलवे नोड येथे व्यंकटेश्वराचे मंदीर उभारण्यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानास भाडेपट्ट्याने जमीन देण्याबाबतचे पत्र पर्यटन मंत्री आदित्य ठाकरे यांनी आज सकाळी देवस्थानचे अध्यक्ष वाय व्ही सुब्बा रेड्डी यांच्याकडे तिरुपती येथे जाऊन सुपुर्द केले. प्रारंभी त्यांनी पहाटे व्यंकटेश्वराचे दर्शन घेऊन पूजा केली तसेच आपल्यासमवेतचे पत्र चरणी अर्पण केले.



आज पहाटे आदित्य ठाकरे यांचे तिरुपती येथे आगमन झाले. त्यांनी प्रारंभी पद्मावती दर्शन केले. यावेळी तिरुपती देवस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी धर्मा रेड्डी , देवस्थ–ानाचे सदस्य मिलिंद नार्वेकर, युवा सेनेचे राहुल कनाल, सूरज चव्हाण व देवस्थानाचे इतर अधिकारी हे देखील उपस्थित होते.

तिरुपती देवस्थानाने विनंती केल्यावर सिडको तसेच राज्य शासनाने अतिशय कमी कालावधीत याविषयीचा निर्णय घेऊन जमीन उपलब्ध करून दिली, त्यामुळे बालाजीच्या लाखो भाविकांची मोठी सोय होणार आहे.. जमीन वाटपाचे पत्र देण्यासाठी स्वतः मंत्री आदित्य ठाकरे तिरुपतीला आले याविषयीही त्यांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.

तिरुमला तिरुपती देवस्थानम बोर्डातर्फे देशात

...../२

# भयंकराच्या दारात

महाराष्ट्राला आणि देशालाही सध्या बसत असणारा उष्णतेच्या लाटेचा तडाखा अभूतपूर्व आहे. काही दिवसांपूर्वीच जगातल्या सर्वाधिक तापणाऱ्या शहरांमध्ये सर्वांत जास्त भारतात आणि त्यातही महाराष्ट्रात असल्याचे स्पष्ट झाले होते. मुंबईपासून विदर्भापर्यंत आणि उत्तर महाराष्ट्रापासून एके काळी सुखद हवामानाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यापर्यंत सर्वत्र काहिलीचा कहर झाला आहे. तापमानाचे एकेक उच्चांक गाठले जात आहेत. चंद्रपुराने काही वर्षांपूर्वी ४८ सेल्शिअस अंशांची मजल मारली होती. तिथवर राज्यातली शहरे गेली नसली, तरी चढ्या तापमानाचा दिवसभरातला कालावधी वाढत चालला आहे; त्यामुळे दिवसाचे तीन-चार तास उष्मा सोसला, तरी सायंकाळ आणि रात्र सह्य असावी, हाही झपाट्याने भूतकाळ होतो आहे. महाराष्ट्र हे देशातील सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. देशात दुचाक्यांची आणि गाड्यांची संख्याही महाराष्ट्रात सर्वाधिक आहे. महाराष्ट्रातच गेल्या काही वर्षांत सिमेंटच्या रस्त्यांचे मोठमोठे प्रकल्प साकारत आहेत. आजही ते होत आहेत. अनेक शहरांमधील टेकड्या जमीनदोस्त झाल्या आहेत. प्रकल्पांसाठी किंवा इतरही कारणांनी राज्यातली वृक्षराजी हटत आहे. या सगळ्या कारणांच्या बेरजेवर देशाच्या वायव्येकडून येत असलेली उष्णतेची लाट चढून बसली आहे. शुक्रवारी राज्यात काही ठिकाणी तुरळक पाऊस पडला; मात्र त्याने तापमान खाली येण्याऐवजी घालमेल तेवढी वाढवली. राज्यात नाशिक, नागपूरसहित विदर्भात झालेले मृत्यू हे सरळ सरळ उष्णतेच्या तडाख्याने झाले आहेत; मात्र सरकार तसे म्हणत नाही. काही दिवसांपूर्वीच उष्माघातांच्या बळींचा आकडा दहाच्या पुढे गेला होता. तो आता निदान दुप्पट झाला आहे. सूर्य आग ओकत असताना, अंगमेहनत करणारेच उष्माघाताचे बळी ठरतात. राज्य सरकारने त्यांच्या कुटुंबांना भरपाई देण्याचा विचार करायला हवा. विजेची वाढती मागणी, झपाट्याने आटत चाललेल्या विहिरी, ओस पडणारे रस्ते, रुग्णांची वाढती संख्या आणि पाण्यासाठी वणवण करणारी गावे, नगरे, शहरे, हे चित्र यापुढे वाढत्या तीव्रतेने कायम राहते की काय, अशी शंका जागतिक हवामान बदलाने निर्माण झाली आहे. या बदलांकडे ना स्थानिक पातळीवर गांभीर्याने पाहिले जाते, ना राष्ट्रीय पातळीवर. आज महाराष्ट्रातील वीस शहरे ४० सेल्शिअस अंशांच्या वरचे तापमान सोसत आहेत. इतर बहुतेक ३५च्या वर आहेत. या वीस शहरांमधलीही निम्मी वारंवार ४५चा आकडा गाठत आहेत. वैज्ञानिकांनी सन १८८० ते २०२० या १४० वर्षांच्या हवामानाचा जो अभ्यास केला; त्यातून कर्ब उत्सर्जन आणि वाढते तापमान यांचा अगदी थेट संबंध दिसून आला आहे. हे तापमान नुसते वाढते आहे, असे नाही. हवामानाच्या एकंदरीत वर्तनात कमालीची अनियमितता येते आहे. आज भाजून निघणाऱ्या महाराष्ट्राला दिलासा आवश्यक असला, तरी कधी ना कधी दीर्घकालीन विचार केला नाही, तर दर वर्षी ही 'चढती भाजणी' अशीच चालू राहील. वाढत्या तापमानाने गेला मॉन्सून चांगला जाऊनही, पाण्याची सार्वत्रिक टंचाई सुरू झाली आहे. राज्य टँकरमुक्त करण्याच्या नुसत्या गप्पा मारल्या गेल्या. प्रत्यक्षात आज औरंगाबादमध्ये टँकरचे ऑनलाइन बुकिंग कसे करता येईल आणि टँकरच्या प्रवासावर तंत्रज्ञानाने देखरेख कशी करता येईल, हे प्रयत्न चालू आहेत. उद्या हेच सगळीकडे चालू होईल. म्हणजे गावे आणि शहरे टँकरमुक्त होणार नाहीतच; उलट या नव्या प्रगतीचे कौतुक होणार. मनमान, चांदवड, लातूर ही शहरे काय किंवा ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भाग काय, मराठवाड्यातील अनेक गावे काय किंवा विदर्भात अमरावती, वाशीम, बुलढाणा जिल्हे काय, सगळीकडे आज तापमान वाढत असताना पाण्याचे दुर्भिक्ष्यही वाढत चालले आहे. माणसांनाच प्यायला पाणी नाही, तर प्राण्यांना आणि पक्ष्यांना पाणी कोण पाजणार? या वाढत्या उष्म्याने राज्यभर फळबागांचेही मोठे नुकसान होते आहे. आंबा, केळी, डाळिंब अशी सगळीच फळे उन्हाने कोळपत आहेत. नाशिकच्या मालेगाव तालुक्यात काही शेतकऱ्यांनी प्रत्येकी वीस रुपयाला एक जुनी साडी, अशी खरेदी करून आणि ती गुंडाळून डाळिंबाची झाडे उष्णतेपासून वाचविण्याचा प्रयत्न चालविला आहे. आता काही दिवसांनी अनेक ठिकाणी अवकाळी पाऊस पडेल आणि सारे ही काहिली वर्षभरासाठी विसरून जातील; मात्र महाराष्ट्राने पुढच्या २५ ते ३० वर्षांच्या हवामान बदलांचा अंदाज घेऊन पीकव्यवस्थापन, शहरांच्या गरजांचे नियोजन, पाण्याचा फेरवापर आणि देशी वाणांच्या वृक्षांचे वनीकरण आदी उपायांचा आराखडा तयार करायला हवा. केवळ एवढेच पुरणार नाही; कारण हा केवळ निसर्गाचा लहरीपणा किंवा कोप नाही. तापमानाचा वाढता पारा हा माणसाच्या करणीचाही परिणाम आहे. त्या दृष्टीने कोणतीही गंभीर चर्चाही कुणी करायला तयार नाही. विकासाचे नवे निसर्गानुकूल; पण मानवकेंद्री प्रारूप तयार केल्याशिवाय हे चटके कमी होणारे नाहीत. महाराष्ट्राने हे काम हाती का घेऊ नये?

# शिवकालीन शस्त्र जाज्वल्य इतिहासाचे साक्षीदार : प्रशांत स्वामी

## शिवरुद्र बहुउद्देशीय संस्थेने आयोजित केलेल्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाला श्रीवर्धनकरांचा उदंड प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । दिघी**

आपल्या महाराष्ट्राचा इतिहास गौरवशाली आहे. छत्रपतींच्या कार्यकर्तृत्वाने महाराष्ट्र अस्मितेची पताका देशाच्या कानाकोपऱ्यात फडकली. आपल्या महाराष्ट्राला कणखर, रागट, दणकट राज्य असे इतिहासकारांनी संबोधले आहे. शिवकालीन शस्त्र मराठी अस्मितेचे प्रतीक आहेत. असे प्रतिपादन श्रीवर्धनचे उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत स्वामी यांनी केले आहे.



श्रीवर्धन नगर परिषदेच्या शाळा नंबर एक च्या सभागृहात शिवरुद्र संस्थेच्या वतीने शैलेंद्र ठाकूर व शुभम चवरकर यांनी आयोजित केलेल्या शिवकालीन शस्त्र प्रदर्शनाचे प्रशांत स्वामी यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. सदर प्रसंगी श्रीवर्धनचे नायब तहसीलदार विपुल ढुमे, श्रीवर्धन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे, श्रीवर्धन प्रांताधिकारी यांच्या पत्नी श्वेता शेडगे, डव्होकेट संतोष सापते, रूपा सुखदरे, मयुरी वैद्य, तेजस ठाकूर, श्रीवर्धन मधील इतिहास प्रेमी नागरिक आदी उपस्थित होते.

शिवरुद्र कराटे अकॅडमी चे विद्यार्थी व उपस्थित इतिहासप्रेमी नागरिकांना प्रशांत स्वामी यांनी संबोधित केले. स्वामी म्हणाले शिवरुद्र संस्थेचा हा उपक्रम निश्चितच इतिहास प्रेमी नागरिकांसाठी आणि श्रीवर्धन मधील तरुणाईसाठी प्रेरणादायी आहे. शिवकालीन ज्ञात-अज्ञात सर्व शस्त्रांची माहिती आज मला या ठिकाणी मिळाली याचा निश्चितच आनंद आहे. आज पर्यंत जे फक्त टीव्ही मालिका व चित्रपट यामध्ये बघितलेली शस्त्र आज प्रत्यक्ष बघण्याचा योग आला. शिवकालीन शस्त्र हे शिवछत्रपतींच्या कल्पकतेचा दूरदृष्टीचा प्रत्येक वेळी प्रत्यय देतात. शिवछत्रपतींनी दूरदृष्टी ठेवून गनिमांना अचूक टिपण्यासाठी तयार केलेल्या प्रत्येक शस्त्राबद्दल निश्चितच कुतूहल आहे. शिवछत्रपती सारखा दूरदृष्टीचा राजा आपणास लाभला हे आ-पले भाग्य आहे. आपल्या संस्थेच्या वतीने आलेल्या प्रत्येक इतिहास प्रेमीला निश्चितच दर्जेदार व उपयुक्त माहिती देण्यात आलेली आहे त्याबद्दल मी आपणा सर्वांचा ऋणी आहे असे प्रशांत स्वामी यांनी सांगितले.

शिवरुद्र संस्थेच्या वतीने आयोजित शस्त्र प्रदर्शनामध्ये तलवार, ढाल, बनाटा, बिचवा, कट्यार, तोफ गोळे, गोफण, वाघनखे, खंजीर, भाला त्यासोबत मराठा मुघल आणि राजपूत यांच्याकडील विविध प्रकारच्या तलवारी प्रदर्शनामध्ये ठेवण्यात आल्या. प्रत्येक तलवारीचे वैशिष्ट्य, आकार,वजन याची माहिती शिवरुद्र संस्थेच्यावतीने प्रदर्शनात उपस्थित असणाऱ्या इतिहासप्रेमींना देण्यात आली.

# एमपी.एस.सी परीक्षेत ओबीसी वर्गात अव्वल नंबर

**दै.रायगड नगरी । कळंबोली**

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत शिक्षण घेतलेल्या नेरे येथील सायली श्याम ठाकूर ने एमपी.एस.सी परीक्षेत ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. शासन सेवेत प्रथम वर्ग अधिकारी म्हणून तिची नियुक्ती करण्यात येणार आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून खडतर अभ्यासाचा डोंगर पार करून सायली ठाकूरने मिळवलेल्या घवघवीत यशाबद्दल तिच्यावर पनवेल मधून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



पनवेल मधील नेरे येथील ग्रामीण भागातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या सायली शाम ठाकूर ने उच्च माध्यमिक शिक्षण सुधागड एज्युकेशन सोसायटी च्या के.आ.बांठिया विद्यालय मध्ये पूर्ण केले. त्यानंतर तिने खालापूर जवळील शांतिनिकेतन तंत्र विज्ञान महाविद्यालयातून इलेक्ट्रॉनिक्स मध्ये पदवी प्राप्त केली .मात्र खाजगी कंपनी मध्ये सेवा करण्यापेक्षा प्रशासकीय सेवा करून जनसेवा करण्याची जिद्द उराशी बाळगल्याने तिने एमपीएससी परीक्षेची तयारी सुरू केली. अभियंता चे शिक्षण पूर्ण करून सुद्धा शासकीय सेवेचा ध्यासाने तिने एमपीएससी परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात यश संपादन केले आहे . महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने सन २००० मध्ये घेतलेल्या परीक्षेतून राज्यातील ओबीसींच्या महिला प्रवर्गातून तिने राज्यात प्रथम क्रमांक पटकावून पनवेल सह राज्याचे नाव उंचावले आहे.

घरची परिस्थिती अत्यंत बेताची असल्याने व परिस्थितीची जाण मनात घर करून राहिल्याने तिने शासकीय सेवेचा ध्यास हा शालेय जीवनामध्ये घेतला होता.अन् सायलिने ते प्रत्यक्षात आपल्या अपार मेहनत व जिद्दीच्या जोरावर खडतर अभ्यासक्रम पूर्ण करून प्रत्यक्षात पूर्ण ही करून दाखविला. शासन सेवेसाठी आवश्यक असणारी एमपीएससी परीक्षा पहिल्याच प्रयत्नात पास झाल्याने नुकतीच शासकीय सेवे पूर्वी असणारी खरतर मुलाखतही तिने यशस्वी पूर्ण केली आहे.आता तिला शासन सेवेतील प्रथम वर्ग अधिकारी म्हणून नियुक्ती दिली जाणार आहे. सायली ठाकुर चे वडील नोकरी करत असून आई ही गृहिणी आहे. मात्र आई वडिलांनी घेतलेल्या अपार कष्टाचे चीज तिने करून दाखवले आहे. सायलीने मिळवलेल्या अपूर्व यशाबद्दल विशेष करून आगरी समाजातून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे. आम्ही घेतलेल्या अपार कष्टाचे सायलीने स्वकर्तृत्वावर व कोणताही क्लास न लावता खडतर असा अभ्यासक्रम पूर्ण करून एमपीएससी परीक्षेत मिळालेल्या घवघवीत यशाबद्दल आमच्या कुटुंबियांचा व नातेवाईकांचा आनंद गगनात मावेनासा झाला असल्याचे सायलीचे वडील श्याम ठाकूर यांनी बोलताना आनंद व्यक्त केला आहे.

# उरणमध्ये बीएमएसच्या १० व्या त्रैवार्षिक अधिवेशनाला सुरूवात

**दै.रायगड नगरी । उरण**

देशातील विविध बंदरात काम करणाऱ्या हजारो कंत्राटी, कायमस्वरूपी,संघटित, असंघटित कामगारांच्या न्याय हक्कांसाठी लढा द्यावा लागेल. यासाठी वेळ पडल्यास राज्य, केंद्र सरकारच्या कामगार विरोधी धोरणाविरोधात जोरदार संघर्षाची भूमिका घ्यावी लागेल.कामगारांना भेडसावणाऱ्या विविध समस्या सोडविण्यासाठी व त्यांच्या न्याय हक्कासाठी कामगारांनी एकजूट होऊन संघर्षासाठी सज्ज व्हा असे आवाहन भारतीय पोर्ट ण्ड डॉक मजदूर महासंघाचे ( बीएमएस ) राष्ट्रीय सचिव रविंद्र हिमते यांनी उरण येथे केले.



भारतीय पोर्ट ण्ड डॉक मजदूर महासंघाचे ( बीएमएस ) १० वे त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशन उरण येथे शनिवारपासून सुरू झाले आहे. ३० एप्रिल ते १ मे दरम्यान जेएनपीटीच्या कामगार संघटना बहुउद्दे-शीय सभागृहात दोन दिवस भरविण्यात आलेल्या आलेल्या अधिवेशनाचे उद्घाटन शनिवारी (३०) महासंघाचे राष्ट्रीय सचिव रविंद्र हिमते यांच्या हस्ते झाले.याप्रसंगी स्वागताध्यक्ष म्हणून उरणचे आ. महेश बालदी, महासंघाचे महाराष्ट्र राज्य जनरल सेक्रेटरी मोहन येणूरे, विशाल मोहिते, आयोजक भारतीय पोर्ट ण्ड डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महासचिव सुरेश पाटील, राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत, जेएनपीटी वर्कर्स युनियनचे अध्यक्ष बी.के. ठाकूर, जनरल सेक्रेटरी रवींद्र पाटील, जेएनपीटी जनरल कामगार संघटनेचे उपाध्यक्ष मधुकर पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

या उद्घाटनप्रसंगी अधिवेशनात कामगारांना मार्गदर्शन करताना महासंघाचे राष्ट्रीय सचिव रवींद्र हिमते यांनी संघटनेच्या माध्यमातून देशभरात सुरू असलेल्या विविध योजना, कामगारांच्या न्याय हक्कांसाठी सुरू असलेल्या विविध लढे व संघर्षाचीही माहिती करुन देण्यात आली.कामगारांनी कामगारांच्या न्याय हक्कांसाठी उभारण्यात आलेली कामगार संघटना म्हणजेच भारतीय पोर्ट ॲण्ड डॉक मजदूर महासंघ होय.देशातील विविध बंदरात कंत्राटी, कायमस्वरूपी, संघटित,असंघटित आदी क्षेत्रात हजारो कामगार काम करीत आहेत.त्यांच्या न्यायहक्कासाठी त्यांचे प्रश्न, समस्या सोडविण्यासाठी आणि कामगारविरोधी धोरणाविरोधात वेळ पडल्यास भारतीय पोर्ट ण्ड डॉक मजदूर महासंघ संघर्ष करेल यासाठी बंदर क्षेत्रातील कामगारांनी एकजूट होऊन संघर्षासाठी सज्ज व्हा असे आवाहन महासंघाचे राष्ट्रीय सचिव रविंद्र हिमते यांनी अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी केले.

याप्रसंगी स्वागताध्यक्ष आ. महेश बालदी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. विविध बंदरातील संघटित, असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या सुरक्षितता व नोकऱ्या टिकवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.कामगारांना कामगार कायद्यानुसार सोयीसुविधा उप-लब्ध करून देण्याची गरज असल्याचीही भुमिका आमदार महेश बालदी यांनी मनोगतातून मांडली.यावेळी संघटनेचे क्षेत्रीय संघटनमंत्री सी.व्ही.राजेश, राष्ट्रीय उपाध्यक्ष जगदिश्वर राव, इंडस्ट्री ण्ड पोर्ट विभागाचे प्रभारी चंद्रकांत धुमाळ, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष अनिल ढुमणे, भवानी शंकराडू यांनीही मार्गदर्शन केले. दोन दिवस चालणाऱ्या या त्रैवार्षिक राष्ट्रीय अधिवेशनात रविवारी खासदार मनोज कोटक,प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार रामशेठ ठाकूर,प्रशांत ठाकूर आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. दोन दिवसांच्या या राष्ट्रीय अधिवेशनात बंदराचे खाजगीकरण,नविन कामगार विरोधी कायदे, कंत्राटी कामगारांच्या समस्या,जॉब सेक्युरिटी, विविध बंदरातील स्थानिक समस्यांवर चर्चा करून ठराव मंजूर करण्यात येणार आहेत. त्यानंतर पुढील तीन वर्षांसाठी संघटनेची नव्याने कार्यकारिणीची निवड करण्यात येणार असल्याची माहिती भारतीय पोर्ट ॲण्ड डॉक मजदूर महासंघाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष सुधीर घरत यांनी दिली आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## फोटो स्टुडिओ मधील ३ कॅमेरे, लॅपटॉप व कॉम्प्युटर घेऊन केला पोबारा

सांगितले आहे. उरण पोलीसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन या उरण शहरातील नितीन फोटो स्टुडिओचा पंचनामा केला असून अज्ञात चोरट्यांचा शोध घेण्यासाठी तपासाची चक्रे फिरवण्यास सुरुवात केली असून या चोरट्यांना अवघ्या काही दिवसातच जेरबंद करणार असल्याचा विश्वास उरण पोलिसांनी व्यक्त केला आहे.

## कशेडी घाटामध्ये दोन अपघात ; दोघेजण ठार तर अन्य किरकोळ जखमी

संदीप शिरगांवकर हे वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करीत आहेत. याप्रकरणी तुषार प्रकाश चव्हाण या मयत चालकाविरूध्द गुन्हा रजि.नं. ३१-२०२२ नुसार ३०४अ, २७९,३३७,३३८ आणि मोटारवाहन कलम१८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर कशेडी घाटात शनिवार, दि.३० एप्रिल २०२२ रोजी पहाटे सव्वा चार वाजण्याच्या सुमारास इको कार व आयशर टेम्पो यांचा अपघात झाल्याचे समजल्यावर कशेडी टॅप वाहतूक पोलीस टॅपचे पोलीस उपनिरीक्षक ए.पी. चांदणे हे स्टाफसह घटनास्थळी तातडीने रवाना झाले.

यावेळी आयशर टेम्पो क्रमांक एम.एच.०८ एम १२९८ वरील चालक कासीम युसुफ बोट (वय ४९, रा.सुरळ ता.गुहागर) हा विक्रोळी ते चिपळूण असा चालवत घेऊन जात असता आयशर टेम्पोचा जॉईन्ट तुटल्याने चालकाचा गाडीवरील ताबा सुटून त्याच्यापुढे जाणारी इको कार क्रमांक एम.एच.०३-झेड-२४८४ हिला जोराची धडक बसून ईको गाडी चालक हेमंत दत्ताराम ब्रीद (वय-२१ रा.तांबेडी सध्या रा. कुंवारबाव ता.जि.रत्नागिरी) यांचेसह कार फेकली जाऊन रस्त्याचे बाजूला जाऊन पलटी झाली.

आयशर टेम्पो रस्त्याच्या कट्टयावर एका कुशीवर जाऊन पलटी झाला असुन अपघातात दोन्ही वाहनांमधील इसमाना कोणत्या प्रकारच्या दुखापती झालेल्या नाहीत. दोन्ही वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.दोन्ही वाहने रस्त्याच्या बाजूला करण्यात आल्याची माहिती यावेळी कशेडी टॅप वाहतूक पोलीस शाखेचे पोलीस उपनिरिक्षक ए.पी.चांदणे यांनी दिली.

## समस्यांना वाचा फोडण्यासाठी शिवसेनेने काढला धडक मोर्चा

विभाग प्रमुख सुशांत जाधव, भोजराज होकार, उपविभाग प्रमुख जयराम खैरे, चंद्रगुप्त साळवी शाखाप्रमुख सुनील औटी, प्रसाद शिरोडकर, पुंडलिक म्हात्रे, सचिन धाडवे, विठ्ठल चव्हाण, मंगेश पवार, माजी शाखाप्रमुख राजीव गंमरे उपशाखाप्रमुख बाळू भोर,दीपक चांदिवडे, शाखा संघटिका रशिदा शेख, शिवसैनिक किशोर कदम सह युवासैनिक व प्रसिद्ध डॉ दंत चिकित्सक विघ्ने व दुग्ध व्यावसायिक गावडे इत्यादी सह अनेक कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. वसाहतीमधील विजेच्या समस्येसंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारून लवकरात लवकर वीज वितरण सुरळीत न केल्यानं महावितरणच्या कार्यालयाला टाळे ठोकू असा इशारा शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी बैठीकीत दिला.

## आदित्य ठाकरे यांनी केले तिरुपती देवस्थानास सुपुर्द

हैद्राबाद, चेन्नई, कन्याकुमारी, बंगलुरु, विशाखापट्टनम, भुवनेश्वर, जम्मू, नवी दिल्ली, कुरुक्षेत्र व ऋषिकेश या ठिकाणी शहर पातळीवरील सुविधा म्हणून भगवान श्री व्यंकटेश्वराचे मंदीर उभारणी करण्यात आली आहे. या धर्तीवर नवी मुंबईमध्ये मंदिर उभारण्यासाठी तिरुमला तिरुपती देवस्थानाने जमीन उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती.

नवी मुंबईतील श्री व्यंकटेश्वराचे मंदीर भाविकांसाठी तसेच पर्यटकांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरणार आहे. त्यामुळे त्या परिसराला धार्मिक व सामाजिक महत्त्व प्राप्त होऊन स्थानिक परिसरात रोजगार संधी निर्माण होतील. या देवस्थानामार्फत या परिसरात अनेक समाज उपयोगी उपक्रम हाती घेण्यात येणार आहेत. सर्व बाबींचा विचार करुन एक विशेष बाब म्हणून हा भूखंड उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

# भारताचा ओम वर्मा टेनिस चॅम्पियन; रामशेठ ठाकूर इंटरनॅशन स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा खेळाडू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

श्रीलंकेत संपन्न झालेल्या एशियन टेनिस फेडरेशनच्या १४ वर्षाखालील आंतरराष्ट्रीय लॉन टेनिस चॅम्पियनशिपमध्ये भारतीय संघ तसेच रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या ओम वर्मा या खेळाडूने जर्मनीच्या लुईस एलिह नीसे याला पराजित करून विजेतेपद पटकाविले.



श्रीलंकेतील कोलंबो झालेल्या एटीएफ १४ अंडर सिरीज या स्पर्धेत श्रीलंका, यूएसए, भारत, कोरिया आणि जर्मनीच्या खेळाडूंनी भाग घेतला होता. उपांत्यपूर्व फेरीत ओम वर्मा याने श्रीलंकेच्या आहिल मोहमद कलिल याला ६-२ आणि ६-२, तर उपांत्य फेरीत श्रीलंकेच्याच साहा कपिलसेना याला ६-२ व ६-३ या सरळ सेटने पराभव केला. २९ एप्रिलला झालेल्या अंतिम सामन्यात जर्मनीच्या खेळाडूचाही ६-३, व ६-४ अशा सरळ सेटमध्ये पराभव करत ओम वर्मा ने बाजी मारली. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या उलवा नोड येथे असलेल्या रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स क्लबचा ओम सदस्य असून तो या ठिकाणी टेनिसचा सराव करत आहे. त्याच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे.

# वडाचीवाडी गावच्या सुजाताबाई कदम यांना अल्पशा आजाराने देवाज्ञा

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगाव तालुक्यातील इंदापूर (वडाचीवाडी) गावचे विनायक कदम यांच्या मातोश्री सुजाताबाई कदम यांना नुकतीच अल्पशा आजाराने देवाज्ञा झाली. निधनासमयी त्यांचे वय ७० वर्षे होते. त्यांच्या निधनाने कदम कुटुंबीयांसह सबंध पंचक्रोशीतील वाता-वरण शोकाकुल झाले आहे.

अतिशय प्रेमळ, सर्वांशी मिळून मिसळून वागणा-या सूजाताबाई सुभाष कदम या सर्व आप्तस्वकीय, मित्र परिवार यांच्यामध्ये विशेष प्रिय होत्या. अतिशय काबाडकष्ट करून त्यांनी आपल्या मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण दिले. कुटुंबात शांत, सय्यमि आणि प्रेमळ स्वभामुळे सर्वांनाच त्या खुप आवडत्या होत्या.आपल्या सुनांवर त्यांनी मूली सारखे प्रेम केले. पारंपारिक सणासुदिच्या कार्यक्रमात त्यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरत. त्यांना अचानक अल्पशा आजाराने ग्रासले त्यातच त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनाचे वृत्त कानी पडताच अनेकांनी त्यांच्या अंत्यदर्शनासाठी धाव घेतली. त्यांच्या अंत्ययात्रेकरीता सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह आप्तस्वकीय असा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार झाल्यानंतर श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून त्यांचे दशक्रिया गुरुवार दि.५ मे तर अंतिम धार्मिक उत्तर कार्य विधी रवी दि. ८ मे रोजी वडाचीवाडी येथील राहत्या निवासस्थानी करण्यात येणार आहेत.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## वशेणी येथील सामाजिक कार्यकर्ते मधुकर म्हात्रे यांचे दु:खद निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील वशेणी येथील समाजिक कार्यकर्ते मधुकर मुरलीधर म्हात्रे(६०)यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या जाण्याने त्यांच्या कुटुंबातील कर्ता हरपल्याने मोठी पोकळी निर्माण झाली असून कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे. तर सामाजिक कार्यात नियमित सहभागी होणारे मधूकर म्हात्रे वशेणी गावसह काळाचौकी मुंबई येथेही आपल्या कार्याचा ठसा उमटविला होता. त्यांच्या अचानक जाण्याने त्यांच्या कुटुंबियांसह विविध सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी शोक व्यक्त केला आहे. त्यांच्यात पश्यात त्यांची पत्नी, मुलगा, मुलगी, सून, ३ भाऊ व ३ सासुरवाशीण बहिणी आणि नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे. त्यांचे उत्तरकार्य १ मे २०२२ रोजी राहत्या घरी वशेणी येथे होणार असल्याचे त्यांच्या कुटुंबीयांनी सांगितले.

## आजच्या अंधारमय वातावरणात देश सावरण्याची गरज : प्रा.एल.बी.पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

आज देश अस्थिर आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय, औद्योगिक इत्यादी क्षेत्रात देश अतिशय कमकुवत झालेला आहे.त्याला सावरण्याची गरज आहे. असे विचार प्रा. नामदेव जाधव यांच्या आज छ.शिवाजीमहाराज जीवंत असते तर या पुस्तकाचे प्रकाशन करताना अध्यक्ष, रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील यांनी कर्जत येथे काढले.

आजच्या तरुणाईने धंदा करावा. त्यासाठी उद्योजक शिबीर आयोजित करून जिल्हा शिव संस्थेच्या अध्यक्षपदी अड. गोपाळ शेळके यांची नेमणूक केल्याचे प्रा.जाधव यांनी जाहीर केले.

# महाराष्ट्र धर्म आणि लोककल्याणकारी योजनांची आघाडी

महाराष्ट्र हे छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विच–राने निर्माण झालेले राज्य आहे महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी अनेकांचे योगदान आहे. महाराष्ट्राला स्वतंत्र राज्याचा दर्जा १ मे १९६० रोजी प्राप्त झाला. राज्याला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक संपन्न वारसा आहे. देशातील सर्वांत प्रगत पुरोगामी, सुधारणावादी राज्य असलेल्या आपल्या महाराष्ट्रात महाविकास आघाडी सरकार स्थापन होऊन दोन वर्षाहून अधिक कालावधी पूर्ण झाला आहे. या कालावधीत राज्यातील महाविकास आघाडी सरकारने जनसामान्यांच्या हितासाठी स्विकारलेली धोरणे, घेतलेले निर्णय महत्त्वाचे ठरले असून या निर्णयांमुळे महाराष्ट्रात मोठया प्रमाणात विकास घडून आला आहे. म्हणूनच साऱ्या देशाचे लक्ष महाराष्ट्राकडे आहे.

समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाच्या वाटेवर अथक निरंतर चालत राहण्याची महाराष्ट्राची परंपरा आजही कायम आहे. महाविकास आघाडी सरकारचा बहुतांश कालावधी कोविड विषाणूचा अतिशय नेटाने, नियोजनबध्दरितीने मुकाबला करण्यात गेला. मात्र या विषाणूच्या आक्रमणाला न जुमानता या सरकारने वेगवेगळया आघाड्यांवर अधिक जोमाने काम करण्यास सुरुवात केली. कोरोना प्रतिबंधक लसीमध्ये महाराष्ट्र अव्वल ठरले आहे. सर्वसामान्यांना केंद्रबिंदू मानून काम करत राहू, आणि सर्वांगिण विकासाच्याबाबतीत महाराष्ट्राला देशात क्रमांक एकचे राज्य बनवू. या दृढ निश्चियाने राज्याचे मुख्यमंत्री उध्दव बाळासाहेब ठाकरे यांनी महाराष्ट्राच्या हितासाठी व विकासासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले. विविध क्षेत्रांसाठी नवनवीन योजना नुसत्या आणल्याच नाही, तर राबवूनही दाखविल्या. गडकिल्ले संवर्धन, प्राचीन मंदिराचा जीवर्णोध्दार देशाला दिशादर्शक असे इलेक्ट्रिक वाहन धोरण, पर्यटन व्यवसायातून रोजगाराच्या संधी निर्माण करून लोकांमध्ये आत्मविश्वास जागविण्यात हे शासन यशस्वी ठरले.

शेतकऱ्यांना कर्जमुक्ती देणारी महात्मा ज्योतिबा फुले कर्जमुक्ती योजना यशस्वीपणे राबविली. चक्रीवादळ, अतिवृष्टी, महापूरसारख्या नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना केंद्राचे निकष बाजूला ठेऊन अधिकाधिक मदत करण्यात आली. गेल्या दोन वर्षात कोरोना काळात गरिबांचे पोट भरणारी शिवभोजन थाळी अनेक गरजूंना आधार बनली. सर्वसामान्य माणूस, शेतकरी, उद्योजक, विद्यार्थी, व्यापारी आदी घटकांना आधार देत एकजूटीने, एकदिलाने काम करून सर्वच क्षेत्रात महाराष्ट्राची पताका डौलाने फडकवणारे हे सरकार सर्व कसोट्यांना खरे ठरले. कोरोनाच्या संकट काळात राज्य शासन विविध घटकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहीले. या आपत्तीकाळात विकासकामांना खिळ न बसवता त्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला. सोबतच आरोग्य यंत्रणा बळकट करण्यात आली.

कोकण विभागात दोन वर्षात भरीव कार्य उभे राहीले, अगदी मोजकेच सांगायचे झाले तर, रत्नागिरी जिल्हयात श्रीक्षेत्र गणपतीपूळे विकासासाठी १०२ कोटी खर्च, गोव्याच्या धर्तीवर आरेवारे तसेच गुहागरच्या सागर किनाऱ्यांवर बिच शॅकला मान्यता, मांडवी गावालगतच्या मिऱ्या बंदरावर १६० कोटीच्या बंधाऱ्यास पर्यटन केंद्राच्या स्वरुपात बांधल्याने रत्नागिरीच्या आकर्षणात वाढ, काताळ शिल्पांचे जतन करून त्यापर्यंत पर्यटक जावेत यासाठी विशेष नियोजन, हापूस, काजूसाठी विशेष धोरण, शीतगृहांची निर्मिती.

ठाणे जिल्हयात आंतरराष्ट्रीय दर्जाचे नवी मुंबईतील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाची उभारणी, ठाणे आणि मुलूंड या दोन शहरांना जोडणाऱ्या कोपरी पुलाच्या दोन मार्गिका सुरु, अंबरनाथ मधील प्रसिद्ध शिवमंदिराचा कायापालट व मंदिराच्या परिसराचा विकास, ऐतिहासिक दुर्गाडी किल्ला परिसरात साकारणार नौदलाचा इतिहास. कल्याण–डोंबिवली महापालिका क्षेत्रातीन दुर्गाडी किल्ला परिसराचा विकास, नवी मुंबईपासून मुंबई–एलिफंटा–जेएनपीटी अशा विविध मार्गांवर वॉटर टॅक्सी सेवा सुरु करण्यात आली आहे. त्यासाठी नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर येथे प्रवासी जेट्टी उभारण्यात आली आहे, ठाणे जिल्हयातील पोलीस दलाच्या बळकटीकरणाअंतर्गत ५ कोटी ८८ लाख २१ हजार रुपये इतक्या निधीतून १४७ वाहने देण्यात आली आहेत, स्मार्ट सिटी प्रकल्पात ठाणे जिल्हा अग्रेसर. ठाणे स्मार्ट सिटीचा समावेश देशा–तील १०० शहरांमधून १० शहरामध्ये झाला आहे.

रायगड जिल्हयात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामासाठी ४०६ कोटींची प्रशासकीय मान्यता तसेच इतर शासकीय बाबींची पूर्तता झालेली असून लवकरच महाविद्यालयाचे बांधकामही प्रत्यक्षात सुरू होईल. यावर्षी १०० विद्यार्थ्यांची पहिली तुकडी सुरु झाली आहे, विभागीय क्रीडा संकुलाची उभारणी, जलवाहतूक, रस्ते वाहतूकीसाठी विविध प्रकल्प कार्यान्वित, औद्योगिक विकासात रायगड जिल्हा अग्रेसर. ऑक्सीजन हब म्हणून नावलौकीक, नैसर्गिक आपत्तीच्या काळात वीजामुळे होणारी मनुष्यहानी टाळण्यासाठी रस्त्याच्या कडेला उभारण्यात येणाऱ्या नव्या ८२ निवारा शेडमध्ये वीज प्रतिरोधक यंत्रे बसविण्यात येणार, रायगड जिल्हयातील मोठीजूई, बोरली, राजापूरी आणि आवास अशा ४ ठिकाणी चक्रीवादळ निवारा केंद्र उभारण्यात येणार आहे.

पालघर जिल्हयात उपजिल्हा रुग्णालय डहाणू येथे ऑक्सीजन निर्मितीच्या प्रकल्पाचे लोकार्पण, चिकूसाठी स्वतंत्र संशोधन केंद्र, जव्हार पर्यटन क्षेत्र विकासासाठी विशेष विकास कार्यक्रम, आदिवासी विकासासाठी विविध योजना कार्यान्वित. विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप ,डहाणू–बोर्डी किनाऱ्यावर पर्यटन विकास, पालघर जिल्हयात प्रशासकीय इमारतीची उभारणी. एकाच क्षेत्रात सर्व शासकीय कार्यालये, मौजे टेंभोडे येथे १६ एकर जागेमध्ये राष्ट्रीय दर्जाचे जिल्हा क्रिडा संकुल विकसित करण्यात येत आहे. कोकण विभागाची अशी भलीमोठी यादी देता येईल.

आज महाराष्ट्र दिनानिमित्ताने एवढेच की, महाराष्ट्राने सतत 'महाराष्ट्र धर्म' जोपासला. लोककल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीमधील महाआघाडीमुळेच साऱ्या देशाचे 'आशास्थान' महाराष्ट्र बनले आहे. प्रेरक इतिहासाचा शिव वारसा घेऊन उज्वल भविष्याकडे झपाट्याने निघालेल्या माझ्या महाराष्ट्राला मानाचा मुजराच हवाच!

**विभागीय माहिती कार्यालय,**
**कोकण भवन, नवी मुंबई**

## हिंदु मुस्लिम एकोप्यासाठी तानाजी नारनवर प्रयत्शील : रमजान ईदच्या दिल्या शुभेच्छा



**दै.रायगड नगरी । नागोठणे**

नागोठण्यातील हिंदु–मुस्लिम समाज बांधव नेहमीच मित्रत्वाच्या नात्याने व एकोप्याने राहत आले आहेत. एकमेकांच्या सणांमध्येही हिंदू–मुस्लिम बांधव सहभागी होत असतात हा नागोठण्याचा इतिहास आहे. असे असले तरी भविष्यात दोन्ही समाजात कधी तेढ निर्माण होणार नाही याची शाश्वती कोणीच देऊ शकत नसल्याने नागोठणे पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तानाजी नारनवर हे आपले कर्तव्य बजावत असताना हिंदु मुस्लिम समाजाच्या एकोप्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असल्याचे दिसून येत आहेत.

याचाच एक भाग म्हणून गुरुवार दि. २८ एप्रिल रोजी नागोठणे पोलीस ठाणे हद्दीतील बेणसे मोहल्लयातील मशिदीत उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सूर्यवंशी व पो. नि. तानाजी नारनवर यांच्या प्रमुख उपस्थितीत रमजान ईद सणाच्या अनुषंगाने हिंदू मुस्लीम समाजात एकोपा वाढवा यासाठी बेणसे गावातील हिंदू मुस्लीम बांधव व शांतता समिती व मोहल्ला समिती सदस्य यांच्या एकत्रित इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपविभागीय पोलिस अधिकारी व नागोठणे पोलीस निरीक्षक तानाजी नारनवर यांनी मुस्लीम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच रमजान ईद हा सण सर्वांनी एकत्र येऊन आनंदात साजरा करावा, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी, सध्या राज्यात सुरु असलेल्या मशिदीवरील भोंगे या विषयी सर्वांनी संयमाची भूमिका घ्यावी, कोणीही कोणत्याही एका व्यक्तीच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता त्याची खात्री करून मगच योग्य तो निर्णय घ्यावा, काही आडचण असल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात संपर्क साधावा अशा सूचना पोलिस अधिका–यांनी दिल्या.

## पेझारीत कानिफनाथ मंदिराच्या वर्धापनदिन उत्सवाचे आयोजन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

असे श्रध्दा ज्याचे उरी, त्यासी दिसे हा कानिफा मुरारी या कानिफनाथ महाराजांच्या ओव्यांच्या प्रचितीतून अलिबाग तालुक्यातील पेझारी गावातील वरची आळी येथे चौलचे नाथसिध्द नारायण वार्डे गुरूजी व श्रीपंत सांप्रदाय रायगड जिल्हाप्रमुख दिगंबर राणे यांच्या प्रेरणेने स्थापन करण्यात आलेल्या श्री कानिफनाथ मंदिराचा १० वा वर्धापनदिन उत्सव बुधवार ४ मे २०२२ रोजी आयोजित करण्यात आला असून त्यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे

बुधवार ४ मे रोजी सकाळी ६ वाजता अभिषेक व पूजा, ७ वाजता नवनाथांच्या पोथीतील १२ व्या अध्यायाचे वाचन, ८ वाजता श्रीसत्यनारायणाची महापूजा, दुपारी १ ते ३ या वेळेत महाप्रसाद, दुपारी ४ वाजता कानिफनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्याला सुरूवात होईल. रात्री ८ वाजता नवनाथांच्या आरतीने पालखी परिक्रमेचा समारोप, असे कार्यक्रम साजरे होणार आहेत. तरी सर्व भाविक भक्तांनी या कानिफनाथ मंदिराच्या वर्धापनदिन उत्सवास उपस्थित राहून आनंद लुटावा असे आवाहन पाटील कुटुंबीय श्री कान्होबा आस्तान उत्सव समिती पेझारी (वरची आळी), ता. अलिबाग यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना नगरपरिषद तर्फे अभिवादन



**दै.रायगड नगरी । कर्जत**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची आज दि.३० एप्रिल रोजी जयंती त्यानिमित्त कर्जत नगरपरिषदेच्या वतीने त्यांना अभिवादन करण्यात आले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेला नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.याप्रसंगी लेखनिक रविंद्र लाड, शेखर लोहकरे उपस्थित होते.

---

प्रो.जमा रु.५०/–

**वकील : ॲड.प्रफुल्ल तु. कडू**
**ॲड.सना मुजावर**
**ॲड.महेश शेळके**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.श्री.के.एम.सोनावणे साहेब दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१३७०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२/०६/२०२२

**१) सौ.शकुंतला रामकिशोर दिवाकर**
**२) श्रीमती.कविता रामसिंग दिवाकर**
**३) कु.श्वेता रामसिंग दिवाकर**
**४) कु.सिद्धार्थ रामसिंग दिवाकर**
सर्व रा.शिवसंभाजी मार्केट, स्टॉल नं.२,
सेक्टर १५/१६, वाशी, नवी मुंबई
ठाणे, महाराष्ट्र–४००७०३ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

अर्जदार क्र.१ यांचा मुलगा, अर्जदार क्र.२ यांचे पती व अर्जदार क्र.३ व ४ यांचे वडिल मयत **रामसिंग रामकिशोर दिवाकर** यांचे दि.०९/०४/२०२० रोजी बी–२/८, रुम नं.२२, मॉडर्न कॉलेजवळ, वाशी, नवी मुंबई येथे निधन झाले असून सदर मयताच्या नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**Flat No.003, Ground Floor, Bldg. No.12, Lotus Enkay Garden, Village Wavanje, Tal-Panvel, Dist-Raigad**
**Valued at Rs. 14,17,500/-**

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांचा वारस दाखला मिळण्याकरिता अर्ज दिला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार हे मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबद्दल कोणाचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवून दाखल करावी.

वरील मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदरहू कोर्ट वरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मिळकतीचे वारस म्हणून दाखला देईल व त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.२७ माहे एप्रिल २०२२ रोजी माझे सहीने दिले.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मा.राव साहेब कोर्ट

**ॲड.तेजल मोरेश्वर गरुडे**
**अर्जदारांचे वकील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५५१/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

**१) कु.कार्तिक अनिल पुजारी**
वय : १२ वर्षे,
**२) कु.कौशिक अनिल पुजारी**
वय : ७ वर्षे
(तर्फे अज्ञान पालनकर्ता **श्रीमती.चेलुवम्मा अनिल पुजारी**)
**३) श्रीमती.चेलुवम्मा अनिल पुजारी**
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, **कै.अनिल देवराज पुजारी** हे दि.४/१०/२०१८ रोजी त्यांचे राहते घरी फ्लॅट नं.५०२, जय प्लाझा, प्लॉट नं.२२, सेक्टर–२ A करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेले असून ते फ्लॅट नं.५०२, जय प्लाझा, प्लॉट नं.२२, सेक्टर–२ A करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड येथील कायमचे रहिवासी होते. तसेच **कै.अनिल देवराज पुजारी** यांची अर्जदार क्र.३ ही पत्नी असून अर्जदार क्र.१ आणि अर्जदार क्र.२ ही मुले असून त्यांच्या मृत्यूपश्चात वरील अर्जदार हेच त्यांचे वारसदार आहेत.

सदरहू अर्जदार यांनी ते कायदेशीर वारस असल्याबाबतचा वारसदाखला मिळणेसाठी मे.कोर्टामध्ये मुंबई रेग्युलेशन VIII, १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. **कै.अनिल देवराज पुजारी** यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**सिडको हद्दीतील फ्लॅट नं.५०२, जय प्लाझा, प्लॉट नं.२२, सेक्टर–२ A करंजाडे, ता.पनवेल, जि.रायगड त्याचे क्षेत्रफळ १८.०७ चौ.मी.**

तरी सदरील अर्जाबाबत कोणत्याही व्यक्तीस हरकत असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत स्वतः अथवा वकीलांमार्फत हजर राहून आपली हरकत किंवा लेखी म्हणणे द्यावे. अन्यथा वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास हरकत नाही असे समजले जाईल व अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारसदाखला मंजूर करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कोर्टाच्या शिक्क्यानिशी व माझ्या सहीने आज दि.२९/०४/२०२२ रोजी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

राव साहेब

**ॲड.विलास पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.५८३/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

**१) श्री.अरुण मारुती जगताप**
वय : ६० वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.एस.टी.रोड, गणेश मंदिर जवळ, रुम नं.३३३,
गणेश चौक, लाल डोंगर, चेंबुर, मुंबई
**२) श्री.बाळकृष्ण मारुती जगताप**
वय : ५५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.बी टाईप, बिल्डींग नं.४, रुम नं.०/१,
बी विंग, गुरुद्वार जवळ, सेक्टर १०,
कळंबोली नोड, रायगड, महाराष्ट्र
**३) सौ.आशा मारुती जगताप उर्फ सौ.आशा हंसराज सोनवणे**
वय : ५१ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
रा.लाल बहादूर शास्त्री नगर,
एच.एन.रोड, गाळेगांव मोहोने, कल्याण, ठाणे अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांनी पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात **कै.मारुती नारायण जगताप** यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे.

**कै.मारुती नारायण जगताप** यांचा मृत्यू दि.२१/११/२००१ रोजी के.जे.सोमय्या हॉस्पिटल मुंबई येथे झाला आहे. तसेच **कै.मारुती नारायण जगताप** यांची पत्नी **कै.सरुबाई मारुती जगताप** या दि.०२/०५/२०१६ रोजी मयत झाले आहेत. **कै.मारुती नारायण जगताप** यांच्या मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची खालील वर्णनाची सदनिका मिळकती आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**सदनिका नं.बी–४/बी/०:१, सेक्टर नं.१०,**
**अंदाजे क्षेत्रफळ : २५.००० चौ.मी.**

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत, अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज दि.३०/०४/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.सोनावणे सो यांचे न्यायालयात

**अर्जदारांचे वकील : ॲड.रंजन सुर्यकांत पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.६३४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०६/०७/२०२२

**श्री.गणेश वसंत मेहेर**
वय : ५२ वर्षे, व्यवसाय : शेती
रा.रुम नं.२२२, दर्शन दरबार जवळ,
सेक्टर ६, सारसोळे गाव, नेरुळ, नवी मुंबई,
जि.ठाणे, महाराष्ट्र ४००७०६ अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयत **उज्वला गणेश मेहेर** यांचे पती आहेत. मयत **उज्वला गणेश मेहेर** ह्या दि.१२/०५/२०२१ या दिवशी सनशाईन हॉस्पिटल, सेक्टर १६, नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झालेल्या आहेत. मयत **उज्वला गणेश मेहेर** ह्या हयात असताना त्यांच्या मृत्यूसमयी त्यांचे नावे असणाऱ्या, त्यांचे मालकीच्या, ताबेकब्जा, वहिवाटीतील निवासी सदनिका मिळकती होत्या. त्या निवासी सदनिका मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**नोड उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**सेक्टर क्र.२३,**
**भूखंड क्र.१७१**
**वरील ड्रीम सफायर या इमारतीतील**
**निवासी सदनिका मिळकतींचे वर्णन**

| अ.क्र. | सदनिका क्र. | क्षेत्रफळ (चौ.मी.) |
|---|---|---|
| १ | १०२ | २४.१४१ कारपेट अधिक ५.२२९ बाल्कनी |
| २ | २०३ | २४.४९० कारपेट |

उपरोक्त वर्णन केलेल्या निवासी मिळकती ह्या मयत उज्वला गणेश मेहेर यांचे नावे, ताबेकब्जा, वहिवाटीतील निवासी सदनिका मिळकती होत्या. मयत **उज्वला गणेश मेहेर** यांचे मृत्यूनंतर समुचित ठिकाणी सदरहू निवासी सदनिकांच्या अधिकार अभिलेखात अर्जदार यांचे नावाची नोंद होणेकामीची कार्यवाही पूर्ण होणेकरिता अनुषंगाने वारस दाखला मिळणेकरिता अर्जदारांनी मे.न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

वरील अर्जदार हे मयत **उज्वला गणेश मेहेर** यांचे वारस नाहीत अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वतः अगर वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह मे.न्यायालयात दाखल करावी. सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहीत धरुन मे.न्यायालय अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.३०/०४/२०२२ या दिवशी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

---

मे.राव साहेब यांचे कोर्ट

**अर्जदारातर्फे वकील**
**निलम लक्ष्मण पाटील**

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश व.स्तर, पनवेल यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.६१५/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२९/६/२०२२

**१) श्रीमती.लक्ष्मी मनोहर देशमुख**
वय : ७१ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.२०२, २ फ्लोर, जयराम अनेक्ष, कोलबाड रोड,
खोपट, ठाणे, ठाणे–४००६०१
**२) सौ.रेखा सुरेश गिजे**
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ए १, ००३, तळमजला, कपिलावास्तू कॉम्प्लेक्स,
कोलबाड रोड, प्रताप सिनेमाजवळ, ठाणे (प.) ४००६०१
**३) श्री.संजय मनोहर देशमुख**
वय : ४७ वर्षे, धंदा : शेती
रा.ब्लॉक नं.२०२, अनेक्स, शीतल छाया बिल्डींगच्यामागे,
कोलबाड रोड, ठाणे, ठाणे (प.) ४००६०१
**४) श्री.सतीश मनोहर देशमुख**
वय : ४८ वर्षे, धंदा : शेती
रा.२०२, २ फ्लोर, जयराम अनेक्ष, कोलबाड रोड,
खोपट, ठाणे, शीतल छाया बिल्डींग जवळ, ठाणे–४००६०३
**५) सौ.आरती पंकज फटांगरे**
वय : वर्षे, धंदा : गृहिणी
रा.ई.डब्ल्यू.एस टाईप, बिल्डींग नं.२३/१,
बुद्ध विहार जवळ, सेक्टर १०, नेरुळ (प) ४००६१५ अर्जदार

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, सदर अर्जदार नं.१ ही अर्जदार क्र.२ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्र.२ व ३ हे एकमेकांचे सख्खे भाऊ असून अर्जदार क्र.४ व ५ या त्यांच्या विवाहित बहिणी आहेत. सदर अर्जदार क्र.१ यांचे पती म्हणजेच अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील **मनोहर सिताराम देशमुख** हे दि.११/१०/२०२१ रोजी मयत झालेले आहेत. मयत **मनोहर सिताराम देशमुख** यांची आई म्हणजेच अर्जदार क्र.१ यांची सासू व अर्जदार क्र.२ ते ५ यांची आजी **पार्वती सिताराम देशमुख** या दि.३०/०९/१९६७ रोजी मयत झालेल्या आहेत. मयत **मनोहर सिताराम देशमुख** यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील जमीन मिळकती महाराष्ट्र शासनातर्फे सिडको लि. यांनी साडेबावीस टक्के भूखंड योजनेंतर्गत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाकरिता संपादीत केल्या असून सदर जमीन मिळकतींचे सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे :–

**अ) संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील**
**सिडको संचिका क्र.**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | २६७/८ | ०–५५.०० | १.१९ |

ब) तसेच मयत मनोहर सिताराम देशमुख यांच्या सामाईक मालकीच्या मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथे खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकती आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायड येथील**

| अ.क्र. | सर्व्हे क्रमांक/ हिस्सा क्रमांक | क्षेत्र हे.आर.पॉ. | एकूण क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | २६३/२ | ०–१०.४० | १.५० |
| २ | २६३/४ | ०–०३.८० | ०.२८ |
| ३ | २६९/१ | ०–०२.३० | ०.१६ |
| ४ | ३५१/२ | १–०४.०० | २.२५ |

आता वर नमूद मिळकती आणि मिळकतींच्या संपादनापोटी मिळणारे भूखंड व इतर लाभ मयत **मनोहर सिताराम देशमुख** यांच्या मृत्यूपश्चात त्यांचे कायदेशीर वारस म्हणून सदर अर्जदार व त्यांचे इतर सहमालक यांस मिळणेकरिता अर्जदारांनी सिडको कार्यालयात चाकशी केली असता त्यांस सक्षम कोर्टातून मयतांचा वारस दाखला आणण्याकरिता सांगितले. सबब सदर अर्जदारांनी ते मयत **मनोहर सिताराम देशमुख** यांचे वारस असल्याबाबत वारसदाखला मिळण्याकरिता मे.कोर्टात अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला देणेस कुणाचीही हरकत असल्यास अशा इसमाने त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात सादर करावी. विहित मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारांस त्यांचे विनंतीप्रमाणे वारस दाखला दिला जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.२९ माहे एप्रिल सन २०२२ रोजी माझ्या सहीने व मे.कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

# संक्षिप्त...

## डॉक्टर महिलेची आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील राहत्या घरात एका डॉक्टर महिलेने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

डॉ नागमनी करन बेटकर (२६) या महिलेने ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केली. ही महिला पटवर्धन हॉस्पिटल येथे काम करत होती अशी माहिती खांदेश्वर पोलिसांनी दिली आहे. तिच्या आत्महत्येचे कारण समजू शकलेले नाही, अधिक तपास खांदेश्वर पोलिस करत आहेत.

## महाराष्ट्र दिनी सामाजिक न्याय विभाग उभारणार योजनांचा स्टॉल

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

दि.१ मे महाराष्ट्र दिनानिमित्त पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्याहस्ते पोलीस ग्राऊंड अलिबाग येथे सकाळी ८.०० वा. मुख्य ध्वजारोहण कार्यक्रम संपन्न होणार आहे.

या ठिकाणी सामाजिक न्याय विभागाचा स्टॉल उभारण्यात येणार असून सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यान्वित असलेल्या योजनांची माहिती असणारे संक्षिप्त बॅनर लावण्यात येणार आहेत. समाज कल्याण आयुक्तालय व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देणाऱ्या माहितीपत्रकाचे वाटप करण्यात येणार आहे.

तसेच माहिती पत्रके सर्व ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका येथे वाटपासाठी पाठविण्यात आली आहेत. महाराष्ट्र दिनानिमित्त ग्रामसेवक, विस्तार अधिकारी, मुख्याधिकारी यांच्याकडून ध्वजारोहण कार्यक्रमानंतर योजनांचे संक्षिप्त वाचन करण्यात येणार आहे.

जिल्हा स्तरावरील मुख्य कार्यक्रम तसेच सर्व ग्रामपंचायती, पंचायत समिती व नगरपालिका येथे होणाऱ्या कार्यक्रमांकरिता जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण अधिकारी सुनिल जाधव यांनी केले आहे.

### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# पालीत वाहतूक कोंडीचे विघ्न; अवजड व डंपर वाहतुकीने कोंडी जटिल

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

अष्टविनायक तीर्थक्षेत्र असलेल्या पाली शहरात मोठ्या प्रमाणात भाविक व पर्यटक दाखल होत असतात. भाविक व पर्यटकांची वाहने, तसेच इतर अवजड वाहने व डंपर यामुळे शहरात ठिकठिकाणी वाहतूक कोंडी जटिल होत आहे. दिवसा आणि रात्री देखील कोंडी होत असते. परिणामी पर्यटक, भाविक व नागरिक अक्षरशः मेटाकुटीला आले आहेत. पाली हे तालुक्याचे ठिकाण आहे. परिणामी अनेक लोक कामानिमित्त व विद्यार्थी शाळा व कॉलेजमध्ये येत असतात. परिणामी कोंडीमुळे वाहनचालक, भाविक, पादचारी येथून वाट काढतांना मोठी गैरसोय होते. शिवाय दुर्घटना घडण्याची शक्यता देखील आहे.



बल्लाळेश्वर मंदिर ते ग.बा. वडेर हायस्कूल, मारुती मंदिर चौक ते जुने एस.टी.स्टँड, गांधी चौक ते बाजारपेठ, कुंभार आळी, बँक ऑफ इंडिया, हटाळेश्वर चौक ते मिनिडोअर स्टँड, एसबीआय बँक ते गांधी चौक अशा विविध ठिकाणी नियमित वाहतूक कोंडी होते. पालीत डंपर, ट्रॅक्टर व लक्झरी वाहनांची नियमीत ये-जा सुरु असते. यामुळे वाहनांना येण्या जाण्याचा मार्ग मिळत नाही. तसेच नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालक देखील वाहतूक कोंडीत भर घालतात. पालीतील रस्ते हे खूप अरुंद आहे. अशा अरुंद रस्त्याच्या दुतर्फा अनेकजण आपली दुचाकी व मोठी वाहने पार्क करतात व खरेदी किंवा इतर कामासाठी जातात. अनेक दुकाने, टपर्या व इमारती रस्त्याच्या अगदी कडेला आहेत. काही ठिकाणी तर अनधिकृत बांधकामे देखील बांधली गेली आहेत. याबरोबरच रस्त्याच्या बाजुला सुरु असलेली बांधकामे आणि या बांधकामाचे साहित्य रस्त्यावर पडलेले असते यामूळे येथून मार्ग काढणे वाहनचालकांना शक्य होत नाही. यामुळे देखिल पालीत सतत वाहतूक कोंडी होत असते. तसेच सुट्टयांच्या काळात तर मोठ्या प्रमाणात पर्यटक व भाविक पालीत दाखल होत आहेत. या वाहनांमुळे पालीतील वाहतुकीवर प्रचंड ताण येवुन वारंवार अनेक ठिकाणी वाहतूक कोंडी होत आहे. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी विविध नाक्यांवर पोलीस तैनात असतात मात्र या कारणांमुळे कोंडी जटिल होते.

राज्यशासनाने सन २०१० या वर्षी पाली बाह्यवळण मार्गाला मान्यता दिली आहे. तसेच रस्त्यास १८ कोटी तर भूसंपादनासाठी १० कोटींची मंजुरी मिळाली होती. सदरचा मार्ग हा वाकण पाली मार्गावरील बलाप येथून पाली पाटनुस राज्यमार्ग ९४ ला जोडला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने खाजगी एजन्सीद्वारे मार्गाचा प्लॅन फायनल केला आहे. त्यानुसार रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी त्यास मान्यता देवून प्रांत अधिकाऱ्यांना जमिन अधिग्रहणाच्या सुचना दिल्या होत्या. या मार्गात येणाऱ्या शेकडो शेतकऱ्यांच्या पिकत्या जमिनी नष्ट होणार असल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे. त्यांचा या मार्गाला विरोध आहे. परिणामी विविध कारणांमुळे मार्गाचे काम रखडले आहे. बाह्यवळण मार्ग झाल्यास येथील कोंडी फुटू शकेल.

# व्यावसायिक हंगामाच्या काळात माथेरानकरांवर मंदीचे सावट



**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरान मधील वनसंपदा हळूहळू संपुष्टात येत असतानाच एप्रिल आणि मे ह्या शेवटच्या व्यावसायिक हंगामात स्थानिकांना तीव्र मंदीचे चटके सोसावे लागत आहेत. अन्य उत्पन्नाचे साधन नसल्याने पर्यटन शेतीवर सर्वांचे जीवनमान अवलंबून असते.

एकेकाळी एप्रिल आणि मे महिन्यात माथेरान मध्ये पर्यटकांची तोबा गर्दी पहावयास मिळत होती परंतु यावर्षी पहिल्यांदाच उष्णतेचे प्रमाण सुध्दा भरमसाठ वाढलेले असून या महत्वपूर्ण सुट्ट्यांच्या हंगामात स्थानिकांना मंदीचा सामना करावा लागत असल्यामुळे सर्वांमध्ये चिंतेचे वातावरण दिसत आहे.

मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी नाक्यापासून पर्यटकांना खोटी माहिती आणि चुकीच्या पद्धतीने काही व्यवसायीक मार्गदर्शन करत असल्यामुळे पर्यटकांची होत असलेली दिशाभूल आणि फसवणूक यामुळे दिवसेंदिवस या सुंदर स्थळाची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न काही विघ्नसंतोषी की ज्यांना या गावाबाबत काहीएक स्वारस्य नाही की प्रेम नाही अशा लोकांना वेळीच आवर घातला गेला नाही तर माथेरान हे केवळ नकाशावर राहील आणि स्थानिकांना हे गाव सोडून जावे लागेल अशी भीती यानिमित्ताने व्यक्त केली जात आहे. दस्तुरी नाक्यावर पर्यटकांची दिशाभूल करण्याचे जे काही अनुचित प्रकार घडत असतात त्याला सर्वस्वी जबाबदार येथील पोलीस प्रशासन, नगरपरिषद, वनखाते आणि काही ठराविक लोकप्रतिनिधी आहेत.

दस्तुरी येथील जे कोणी रस्त्यावर व्यवसाय करणारे व्यावसायिक आहेत त्यांच्यामुळे पर्यटकांमधून वेगळाच संदेश जात आहे त्यामुळे या सुंदर स्थळाकडे पर्यटकांनी पाठ फिरवली असून दस्तुरी येथूनच होत असलेल्या व्यावसायिक लुटमारीमुळे पर्यटकांनी आपला मोर्चा थेट आजूबाजूच्या माथेरानच्या पायथ्याशी असणाऱ्या फार्म हाऊस कडे वळविला आहे. त्यामुळे हे ठिकाण वन डे पिकनिक स्पॉट झाले आहे. माथेरान मधील पिढ्यानपिढ्या वास्तव्यास असलेल्या स्थानिकांच्या मुलाबाळांच्या उज्वल भविष्यासाठी जे वेळच्यावेळी पाणी, वीज तसेच नगरपरिषदेच्या सर्व प्रकारच्या बिलांचा भरणा करीत आहेत. आणि संबंधित लोकप्रतिनिधी असोत की स्थानिक नगरपरिषद प्रशासन त्यांना साथ देत आहेत की ज्यांच्यामुळे या गावाची प्रतिमा अक्षरशः मलिन होत चालली आहे. याकामी लवकरच काहीतरी ठोस उपाययोजना केली गेली नाही तर आगामी काळात समस्त स्थानिकांचे जीवनमान अंधकारमय होईल अशी भीती वयोवृद्ध नागरिक करीत आहेत.

# द्रोणागिरी शहरात अंतिम संस्कारासाठी तात्पुरती व्यवस्था करण्याची शिवसेनेची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील द्रोणागिरी शहरात नवीन नोड (वसाहत) वसत आहे. येथे अनेक कुटुंब राहायला आले आ-हेत आणि येत आहेत. द्रोणागिरी शहरातील रहिवासी नागरिकांना स्मशानभूमीचे सुविधा उप-लब्ध करून देणे गरजेचे आहे कारण आजूबाजूच्या गावातील लोक द्रोणागिरी शहरातील रहिवाशांना अंत्यसंस्कारासाठी समशानभुमीचा वापर करून देत नाही. त्यामुळे भविष्यात ही समस्या अधिक तीव्र समस्या बनणार आहे. त्यामुळे द्रोणागिरी नोड मध्ये अंतिम संस्कारासाठी तात्पुरती का होईना त्वरित व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी द्रोणागिरी शिवसेना शहर शाखेचे अध्यक्ष जगजीवन भोईर यांनी सिडको प्रशासनाकडे पत्र व्यवहाराद्वारे केली आहे.

द्रोणागिरी नोडमध्ये नियोजनबद्ध अंतिम संस्कार ची सुविधा उपलब्ध होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात लवकरात लवकर स्मशानभूमीची सुविधा उपलब्ध करून द्यावे अशी मागणी जनतेतून, स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे.

या मागणीसाठी द्रोणागिरी शिवसेना शहर शाखा सतत पाठपुरावा करत आहे. सिडकोने या मागणीकडे दुर्लक्ष केल्यास एखाद्या प्रेताचे अंतिम संस्कार न झाल्यास शहरातील सर्व लोक त्यांच्या मूलभूत सुविधांच्या मागण्यासाठी रस्त्यावर उतरतील. त्यामुळे शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी त्वरित स्मशानभूमीची व्यवस्था करावी अशी मागणी द्रोणागिरी शिवसेना शहर शाखाप्रमुख जगजीवन भोईर यांनी केले आहे.

# कर्जत शहरातील वाहतुक कोंडीच्या प्रश्ना बाबत दुसरी बैठक संपन्न



**दै.रायगड नगरी । कर्जत**

कर्जत शहरातील वाहतुक कोंडीच्या प्रश्ना बाबत संबधित पोलीस ठाणे, नगरपरिषद व समितीच्या सदस्यांची दुसरी बैठक संपन्न झाली.मात्र नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी व नगरसेवक रा-हुल डाळींबकर वगळता सर्वच या बैठकीस पाठ फिरवली.

कर्जतचे तहसिलदार विक्रम देशमुख यांनी शहरातील वाहतुक कोंडीच्या प्रश्ना बाबत दोन दिवसांपूर्वी बैठक घेतली होती, त्यानंतर काल दि.२९ एप्रिल रोजी कर्जत पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक सुवर्णा पत्की यांनी याबाबत बैठक आयोजित केली होती याप्रसंगी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, नगरसेवक राहुल डाळींबकर, जिल्हा शांतता कमिटी सदस्य आणि व्यापारी फेडरेशन कर्जत उपाध्यक्ष रणजित जैन, कर्जत विकास संघर्ष समितीचे सदस्य राजाभाऊ कोठारी, विनोद पांडे, कृष्णा जाधव, प्रशांत उगले,शिवसेवक गुप्ता, अमीर मणियार, महेश गवळे, नगरपरिषद अभियंता लक्ष्मण माने, सुदाम म्हसे, बाळा निकाळजे उपस्थित होते.

शहरात होणाऱ्या वाहतुक कोंडीबाबत चर्चा करून योग्य नियोजन करण्याचे ठरले डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासुन रेल्वे स्टेशन कडे जाणा-या मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येणार असुन महावीर पेठ ते स्टेशन रोड मार्गावर एकतर्फा वाहतुक करण्यात येणार आहे. तसेच बाजारपेठेतील दुकानदारांनी बेकायदेशीर लावलेले रस्त्यावरील लोखंडी फलक, दुकानातील विक्रीच्या वस्तु दुकानाबाहेर ठेवण्यास बंदी करण्यात येणार आहे. लवकरच शुक्रवारचा बाजार पोलिस मैदानावर स्थलांतरित केला जाणार आहे. अशा महत्त्वपुर्ण विषयांवर चर्चा करण्यात आली.

नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, रणजित जैन, राहुल डाळींबकर तसेच कर्जत विकास संघर्ष समितीचे सदस्य यांनी यावेळी काही सूचना मांडल्या त्यावर पोलीस निरीक्षका सुवर्णा पत्की यांनी नागरिकांना ,दुकानदारांना माहिती होण्यासाठी दोन दिवस नगरपरिषद हद्दीत रिक्षा फिरून लाऊडस्पीकर द्वारे माहिती देण्यात येईल त्यानंतर मात्र कायदेशीर कारवाई केली जाईल असे सांगितले.प्रत्येकाने आपआपली जबाबदारी पार पाडावी म्हणजे कारवाईला सामोरे जाण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही.

# तळा पोलीस ठाणे मार्फत रोझा इफ्तार पार्टीचे आयोजन ; जातीय सलोखाचा राखण्याचे आवाहन

**दै.रायगड नगरी । तळा**

हिंदू मुस्लिम यांच्यात जातीय एकोपा रहावा व सर्व सण आनंदी आंनदात साजरा होण्यासाठी सर्व धर्म समभाव,सामाजिक ऐक्य अबाधित राखण्याच्या दृष्टिकोनातून तळा पोलीस ठाणे मार्फत आराध्या हॉल येथे मा.उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविण पाटील यांचे उपस्थितीमध्ये येणारे रमजान ईद सणाचे अनुषंगाने हिंदू मुस्लीम समाजात एकोपा वाढवा या करिता पोलिस ठाणे हद्दीतील हिंदू मुस्लीम बांधव व शांतता कमिटी व मोहल्ला कमिटी सदस्य यांचे उपस्थितीत इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.

सदरवेळी मा.पोलीस निरीक्षक पाटील माणगाव पोलीस ठाणे, पोलिस निरीक्षक गोविंद ओमासे, तळा उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे वरचा मोहल्ला अध्यक्ष नझीर कडू, शिव-सेना तालुका प्रमुख प्रद्युम्न ठसाळ, नगरसेविका नेहा पांढरकामे नगरसेवक नरेश सुर्वे, माजी नगरसेवक विठोबा चांडीवकर, शहर प्रमुख राकेश वडके, माजी सरपंच नमीत पांढरकामे, पत्रकार नझीर पठाण, हसरत पठाण, हमीद कुरूक्कर उपस्थित होते. सदर वेळी प्रविण पाटील उपविभागीय पोलिस अधिकारी सो माणगाव यांनी रमजान ईदीच्या शुभेच्छा देऊन, येणारा सण हा सर्वांनी एकत्र येऊन आनंदात साजरा करावा, कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता घ्यावी.



सध्या राज्यात सुरु असलेल्या मस्जिद वरील भोंगे या विषयी सर्वांनी संयमाची भूमिका घ्यावी, कोणीही कोणत्याही एका व्यक्तीच्या बोलण्यावर विश्वास न ठेवता त्याची खात्री करून मगच योग्य तो निर्णय घ्यावा, असे उप विभागीय अधिकारी प्रविण पाटील यांनी आवाहन केले काही समस्या निर्माण झाल्यास तात्काळ पोलीस स्टेशन मध्ये संपर्क साधावा अश्या सूचना दिल्या आहेत. सायंकाळी ७.१५वा. आजान होताच मुस्लिम बांधवांनी ईश्वराकडे प्रार्थना करून फराळाचा आस्वाद घेऊन रोझा सोडला. सदर ठिकाणी १०० ते १५० हिंदू मुस्लीम बांधव उपस्थित होते.


